RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

**वर्ष ६, अंक ५१(४)]** **गुरुवार, डिसेंबर ३, २०२०/अग्रहायण १२, शके १९४२** **[पृष्ठे ४, किंमत : रुपये ४.००**

**असाधारण क्रमांक ७७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**नगरविकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ डिसेंबर २०२०

**सूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम २०(३)/नवि-१३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने रायगड जिल्ह्याच्या प्रादेशिक योजनेस अधिसूचना क्र.टिपीएस-१४९०/प्र.क्र.३६५/९०/नवि-१२, दिनांक ०४ जुलै १९९२ अन्वये व मुंबई महानगर प्रदेशाच्या प्रादेशिक योजनेस अधिसूचना क्र.टिपीएस-१२९७/१०९४/प्र.क्र.११६/९७/ नवि-१२, दिनांक २३ सप्टेंबर १९९९ अन्वये (यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त प्रादेशिक योजना" असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) मंजुरी दिली असून, उक्त प्रादेशिक योजना अनुक्रमे दिनांक १५ सप्टेंबर १९९२ व दिनांक ०१ डिसेंबर १९९९ पासून अंमलात आलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, शासनाने राज्यातील प्रादेशिक योजनांकरीताच्या प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस अधिसूचना क्रमांक टिपीएस-१८१२/१५७/प्र.क्र.७१/१२/पुनर्रचना क्र. ३४/१२/प्रा.यो./नवि-१३, दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ अन्वये मंजुरी दिली असून, ती उक्त प्रादेशिक योजनांसाठी लागू करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळास रायगड जिल्ह्यातील पनवेल व खालापूर तालुक्यामधील काही गावांसाठी (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त क्षेत्र" असा करण्यात आला आहे) अधिसूचना क्रमांक टिपीएस-१८१५/युडीआर/७८/१५/नवि-१३, दिनांक १७ फेब्रुवारी २०१६, पुरकपत्र क्र. टिपीएस-१८१५/युडीआर/७८/१५/नवि-१३, दिनांक १८ मार्च २०१६, अधिसूचना क्र.१७१७/२७५०/प्र.क्र.९१/१९/एमएसआरडीसी/ नवि-१२, दिनांक १९ सप्टेंबर २०१९ अन्वये, उक्त अधिनियमाच्या कलम ४० पोटकलम (१)(बी) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणे / विशेष नियोजन प्राधिकरणे / विकास प्राधिकरणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नैना, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, हिल स्टेशन नगरपालिका, पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचित केलेली संवेदनशील क्षेत्रे व लोणावळा नगरपरिषद तसेच नियोजन प्राधिकरण म्हणून सिडको कार्यरत असलेले क्षेत्र, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, मिहान, एमएडीसी, एमएसआरडीसी ही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरिता लागू करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन

नियमावलीस (यापुढे ज्याचा उल्लेख "युडीसीपीआर" असा करण्यात आलेला आहे) शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वियो. व प्रायो./कलम ३७(१कक)(ग) व कलम २०(४)/नवि-१३, दिनांक ०२ डिसेंबर २०२०अन्वये मंजुरी दिली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणांच्या उक्त विद्यमान नियमावली ह्या वेगवेगळ्या असल्याने केंद्र शासनाचे औद्योगिक धोरण व प्रोत्साहन विभागाच्या धोरणानुसार राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच इतर नियोजन प्राधिकरणांकरिता एकत्रिकृत सर्वसमावेशक विकास नियंत्रण नियमावली, व्यवसाय सुलभतेच्या रुपरेषेनुसार असणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त क्षेत्रासाठी लागू असणारी विद्यमान विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली बदलून, त्याऐवजी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख 'प्रस्तावित फेरबदल' असा करण्यात आलेला आहे).

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २०(३) अन्वये प्राप्त अधिकारात व तदनुषंगिक शक्तीचा वापर करून, प्रस्तावित फेरबदलावर आम जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिद्ध करीत आहे. या फेरबदलावरील कोणत्याही सूचना/हरकती, ही सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत, सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांचेकडे दाखल करता येतील. प्राप्त सूचना/हरकतींवर सुनावणी देऊन त्यासंबंधीचा अहवाल शासनास सादर करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम १६२(१) अन्वये सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांना ' अधिकारी ' म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर सूचना, कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील :—

(१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, नवी मुंबई, कक्ष क्र. ११०१ ते ११०९, सेल्टन सफायर, ए विंग, अकरावा मजला, सेशन कोर्टसमोर, सेक्टर-१५, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

(२) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई, कोकण भवन, कक्ष क्र.३०५, तिसरा मजला, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

सदरहू सूचना *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**किशोर गोखले,**
शासनाचे अवर सचिव.

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 2nd December 2020.

***Notice***

THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No.TPS-1818/CR.238/18/Sec.20(3)/UD-13.–Whereas, the Government of Maharashtra has sanctioned Regional Plan for Raigad District *vide* Notification No.TPS-1490/CR-365/90/ UD-12, dated 4th July 1992 and Regional Plan for Mumbai Metropolitan Region *vide* Notification No.TPS-1297/1094/CR-116/97/UD-12, dated 23rd September 1999 (hereinafter referred to as 'the said Regional Plans') under the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as 'the said Act') which are come into force from 15th September 1992 and 1st December 1999 respectively;

And whereas, the Government has sanctioned Standardised Development Control and Promotion Regulations for the Regional Plans in the State *vide* Notification No.TPS-1812/157/CR-71/12/Reconstruction No. 34/12/RP/UD-13, dated 21st November 2013 which are applicable to the said Regional Plans ;

And whereas, the Government has appointed Maharashtra State Road Development Corporation as Special Planning Authority for the villages in Khalapur and Panvel Tahsils of Raigad District (hereinafter referred to as 'the said area') under section 40(1)(b) of the said Act, *vide* Notification No.TPS-1815/UDR/78/15/UD-13, dated 17th February 2016, addendum No.TPS-1815/UDR/78/15/UD-13, dated 18th March 2016 and Notification No.1717/2750/CR-91/19/MSRDC/UD-12, dated 19th September 2019;

And whereas, the Government has sanctioned Unified Development Control and Promotion Regulations (hereinafter referred to as 'UDCPR') for the state except Municipal Corporation of Greater Mumbai, other Planning Authorities / Special Planning Authorities / Development Authorities within the limits of Municipal Corporation of Greater Mumbai, MIDC, NAINA, Jawaharlal Nehru Port Trust, Hill Station Municipal Councils, Eco-Sensitive/ Eco-Fragile region notified by MoEF & CC and Lonavala Municipal Council and Area under CIDCO's jurisdiction as Planning Authority, PCNTDA, MIHAN, MADC, MSRDC, in Maharashtra *vide* Notification No.TPS-1818/CR.238/18/DP. And RP./Sec.37 (1AA)(c) and sec.20(4)/UD-13, dated 2nd December 2020;

And whereas, the Department of Industrial Policy and Promotion (DIPP) of Central Government has stated a need for Common Development Control Regulations for all Planning Authorities in the State as per the agenda of 'Ease of doing Business';

And whereas, the Government felt it necessary to replace the existing Development Control and Promotion Regulations applicable for the said area by the new set of Unified Development Control and Promotion Regulations (hereinafter referred to as 'the said modification');

Now therefore, in exercise of the powers conferred under section 20(3) of the said Act and all other powers enabling in that behalf, the Government hereby publishes a notice for inviting suggestions/objections from general public with respect to the said modification. Any objections/suggestions upon the said Modification shall be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this Notice in *Maharashtra Government Gazette*, to the Joint Director of Town Planning, Konkan Division, Navi Mumbai, who is hereby authorised u/s 162(1) of the said Act as an 'Officer' on behalf of Government to hear objections/suggestions and to submit his report to the Government.

This notice is kept open for inspection to the general public in the following offices for the above period on all working days :—

*(i)* Office of the Managing Director, Maharashtra State Road Development Corporation, Room No.1101 to 1109, Shelton Saphire, Eleventh Floor, CBD Belapur, Navi Mumbai.

*(ii)* Office of the Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Belapur, Mumbai.

This notice is also available on the Government website *www.maharashtra.gov.in* (Acts/Rules)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KISHOR GOKHALE,
Under Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.